FORM-I A N.C.R.B. I.I.F. 1

# पहिली खबर

## FIRST INFORMATION REPORT

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम 154 अन्वये (Under Section 154 Cr. P.C.)

1. राज्य महाराष्ट्र, जिल्हा मुंबई, पोलीस ठाणे ला.प्र.वि, पहिली खबर क्र. २०, वर्ष १९, दिनांक ०२/०६/१९
State District Police Station FIR No. Year Date

2. (i) अधिनियम Act भ्र.प्र.अधि. १९८८, कलमे Sections ७
(ii) अधिनियम Act सुधारित २०१८, कलमे Sections
(iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections

3. (a) अपराधाची घटना : वार गुरुवार, तारीख पासून ३०/५/१९, वेळ १४:४५ वा, तारीख पर्यंत १/६/१९, वेळ ११:४४ वा
Occurrence of offence : Day Date from Time Date to Time
वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा. Tick applicable portion)
(1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00
(6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (10) 18.00 ते 06.00
(b) पो. ठा. ला माहिती मिळालेचा तारीख ३०/५/२०१९, वेळ १४:४५ वा.
Information received at P.S. Date Time
(c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. ०१, तारीख २/६/१९, वेळ ०३:२५
General Diary Reference : Entry No. Date Time

4. माहितीचा प्रकार Type of Information : लेखी, लेखी / तोंडी Written / Oral

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा ..., चौकी / बीट / दुरक्षेत्र नाव व क्र. ...
Place of Occurrence : (a) Direction and distance from P.S. Chouki/Beat/O.P. Name and No.
(b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव टाक/साउथ विभाग, ह.क.व्य. खाते, विस्तारीत इमारत, पहिला माळा
Address of Occurrence Name No. if any Ward Name of road
जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण डॉ. बी.ए. रोड, परेल, पोस्ट मुंबई १२, तालुका ..., जिल्हा ..., राज्य ...
Nearest identifiable Place Village Post Taluka Distt. State
(c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो. स्टे. चे नाव ..., तालुका ..., जिल्हा ..., राज्य ...
In case, outside the limit of this Police Station Taluka Distt. State

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.
(a) नाव Name नितेश शिंदे (b) वडीलाचे / पतीचे नाव अशोक शिंदे
Father's /Husband's Name
(c) जन्म तारीख व वय १८/१०/१९९५, २३ वर्षे (d) राष्ट्रीयत्व भारतीय फोन नं. ८६५५४६८७६५
Date of Birth & Age Nationality Phone No.
(e) पारपत्र क्रमांक T 4830920 दिल्याचा दिनांक ०२/०५/१९ दिल्याचे ठिकाण महाराष्ट्र (f) व्यवसाय —
Passport No. Date of Issue Place of Issue Occupation
(g) धर्म Religion हिन्दू, जात Caste ना.स.स्टी., उपजात Sub-Caste ढोर
(h) पत्ता : डी. विंग, गल्ली ४०६, चंद्रेश रिवेरा, लोढा हेवन निळजे, ... वोटर्स नं. ...
Address : Ward House/Name No. Phone/M. No. Pan No. Card No.
रस्त्याचे नाव डोंबिवली (पूर्व) जवळचे ओळख ठिकाण ... गाव ... पोस्ट ... पो. स्टे. ...
Road Nearest identifiable place Village Post P. Stn.
तालुका ... जिल्हा ... राज्य ... सध्याचा पत्ता ...
Taluka Distt. State Present Address

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयीताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासीक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)
Details Name & Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to case diary.)
१) सूर्यकांत आनंदराव जाधव, हि/५० वर्षे.
रा. डी. ६०८ पारिजात गार्डन, बि.नं.५, कासार वडवली, ठाणे (पश्चिम)
मो. नं. ९०८२७००४६६, ९७०२२८३८५८

क

फिर्यादी श्री. नितेश अशोक शिंदे वय २३ वर्षे, रा.ठी. 'डि' विंग, ४०६,
चंद्रेश रिवेरा, लोढा हेवन, निळजे, डोंबिवली पुर्व यांची स्वतंत्र पानावर
घेतलेली फिर्यादी हिच प्रथम खबर म्हणून संबोधण्यात येत आहे.

समक्ष

(अमय दाभाडे)
पोलीस निरीक्षक
ला.प्र.वि. मुंबई

Nitesh Shinde
1/6/19

फिर्याद दिनांक – ०१/०६/२०१९

श्री. नितेश अशोक शिंदे, वय २३ वर्षे, व्यवसाय:– नाही, रा.ठि.– डी/४०६, चंद्रेश रिव्हेरा, लोढा एव्हेन, गाव निळजे, डोंबिवली पुर्व, मो.न. ८६५५४६८७६५

---

मी वरीलप्रमाणे असुन उपरोक्त नमुद पत्त्यावर गेल्या ०८ वर्षापासुन रहावयास आहे. माझे कुटूंबात माझी आई व दोन बहिणी आहेत. माझे वडील कै. अशोक भाऊ शिंदे हे घनकचरा व्यवस्थापक, एफ साऊथ वॉर्ड, परेल, मुंबई येथे चतुर्थ श्रेणी कर्मचारी म्हणून दिनांक ३१/१२/२०१८ रोजी सेवानिवृत्त झाले होते. माझे वडील हे दिनांक २०/०१/२०१९ रोजी मयत झाले.

माझे वडील कै. अशोक भाऊ शिंदे हे सेवानिवृत्त झाल्यानंतर बृहन्मुंबई महानगर पालिकेचे नियमानुसार अनुकंपा तत्वावर वारस नोकरी (पी.टी. केस) करीता मी अर्ज केला व त्याबरोबर नोकरीसाठी आवश्यक ती सर्व कागदपत्रे मी घनकचरा व्यवस्थापक, एफ साऊथ वॉर्ड, परेल, मुंबई येथे जमा केली आहेत. सदरबाबत मी घनकचरा व्यवस्थापक, एफ साऊथ वॉर्ड, परेल, मुंबई कार्यालयात विचारणा करण्यासाठी गेलो असता माझी फाईल कार्यालयात लिपिक श्री. सुर्यकांत जाधव यांचेकडे गेली असल्याची मला माहिती मिळाली. मी लिपिक श्री. जाधव यांच्याकडे माझे फाईल संदर्भात गेल्या तीन महिन्यापासुन विचारणा करण्याकरीता जात होतो, त्यांनी मला प्रत्येक वेळी काहीतरी कारणे देऊन टाळाटाळ केली. दि. ३०/०५/२०१९ रोजी मी व माझा चुलत भाऊ नामे श्री. चंद्रकांत दादासाहेब शिंदे असे दोघे श्री. सुर्यकांत जाधव, घनकचरा व्यवस्थापक, एफ साऊथ वॉर्ड, परेल, मुंबई यांना भेटलो व माझे वारस नोकरी (पी.टी. केस) कामासंदर्भात चर्चा केली असता श्री. जाधव यांनी माझा चुलत भाऊ नामे श्री. चंद्रकांत दादासाहेब शिंदे यांच्याकडे ४५,०००/– रूपयांची मागणी केली.

सुर्यकांत जाधव, घनकचरा व्यवस्थापक, एफ साऊथ वॉर्ड, परेल, मुंबई यांना लाच देण्याची माझी व माझा चुलत भाऊ श्री. चंद्रकांत दादासाहेब शिंदे यांची इच्छा नसल्याने माझा चुलत भाऊ श्री. चंद्रकांत दादासाहेब शिंदे यांनी दिनांक ३०/०५/२०१९ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई येथील दुरध्वनीवर फोन केला. सदरचा फोन हा पो.नि. दाभाडे यांनी घेतला. पो.नि. दाभाडे यांना आम्ही लोकसेवक करीत असलेल्या लाचेच्या मागणी संदर्भात सांगितले असता त्यांनी आम्हाला लागलीच लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई येथे तक्रार देण्यासाठी बोलाविले. त्याप्रमाणे आम्ही तेथे गेलो व पो.नि दाभाडे यांना भेटलो असता त्यांनी त्यांच्या वरिष्ठांकडे उभे केले. त्यांनी दिलेल्या सुचनांप्रमाणे पोनि दाभाडे यांनी सुर्यकांत जाधव हे लाचेची मागणी करीत असल्याबाबत माझा लेखी तक्रार मला मराठी लिहीता येत नसल्याने इंग्रजीमध्ये अर्ज माझे स्वहस्तक्षरात लिहून घेतला व त्यावर माझी सही घेतली. परंतु त्या दिवशी सुर्यकांत जाधव यांच्या कार्यालयाची वेळ संपत आल्याने व लागलीच शासकीय पंच उपलब्ध होवू शकत नसल्याचे पानि दाभाडे यांनी माझे अर्जावर उदया दिनांक ३१/०५/२०१९ रोजी कारवाई करण्यात येईल असे सांगितले.

पोनि दाभाडे यांनी सांगितल्याप्रमाणे मी दिनांक ३१/०५/२०१९ रोजी ला.प्र.वि कार्यालयात सकाळी १०.०० वाजता हजर झालो. त्यानंतर पोनि दाभाडे यांनी दि. ३१/०५/२०१९ रोजी दोन शासकीय पंचांना पाचारण करून त्यांची ओळख करून दिली.

समक्ष,

Nitesh.Shinde

(अभय दाभाडे),
पोलीस निरीक्षक,
ला.प्र.वि., मुंबई

त्यावर पोनि दाभाडे यांनी पंचांना थोडक्यात हकिकत सांगून तक्रार अर्ज पंचांना वाचण्यास दिला. पोनि दाभाडे यांचे सुचनेवरून सदरच्या तक्रार अर्जावर दोन शासकीय पंचांनी स्वाक्षरी करून पोनि दाभाडे यांनी स्वत: स्वाक्षरी करून तक्रार अर्ज स्वत:चे ताब्यात ठेवला.

त्यानंतर पोनि दाभाडे यांनी दिनांक ३१/०५/२०१९ रोजी पंचांसमक्ष पडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगून पडताळणी दरम्यान माझे शर्टाच्या आतील बनियनला डिजीटल व्हाईस रेकॉर्डर लावण्यात येणार असून होणारे संभाषण ध्वनीमुद्रीत करण्यात येणार असल्याचे सांगितले.

पोनि दाभाडे यांनी माझी पडताळणी पथकाची ओळख करून देवून ला.प्र.वि. कार्यालयातून पोलीस पथकासह निघून एलफिस्टन बिजखाली येथे थांबलो. त्यावेळी मला पोनि दाभाडे यांनी सुर्यकांत जाधव, घनकचरा व्यवस्थापक, एफ साऊथ वॉर्ड, परेल, मुंबई यांचे कार्यालयात पडताळणीकरीता डिजीटल रेकॉर्डर चालू करून शर्टचे आतील बनियनला लावून पंच श्री. मुणगेकर यांचे सह पाठविले असता लोकसेवक सुर्यकांत जाधव यांची भेट झाली. त्यावेळी लोकसवेक व माझी फाईल संदर्भात चर्चा झाली. त्यावर लोकसेवक यांनी मला माझा भावाबाबत विचारणा केली असता मी भाऊ हा त्याच्या बायकोच्या डीलीव्हरीसाठी गावी गेला असल्याचे सांगितले. त्यावेळी लोकसेवक यांनी भाऊ काय बोलला का? याबाबत माझेकडे विचारणा केली असता मला रू. ४०,०००/— भावाने आपणास दयावयाचे असल्याचे सांगितले. त्यावेळी मी, रू. ४०,००० रक्कम जास्त असल्याचे सांगितले असता लोकसेवक यांनी निम्मे पैसे आता व निम्मे पैसे माझी फाईल साईन घेवुन हेड ऑफीसला गेल्यानंतर मला देण्याचे सांगितले. त्यानंतर मी पुन्हा पोलीस वाहनाजवळ आलो असता पोनि दाभाडे यांनी व्हाईस रेकॉर्डर काढून झालेल्या संभाषणाची हकीकत विचारून व्हाईस रेकॉर्डरमधील संभाषण ऐकुन लोकसेवक यांची पडताळणी दरम्यान लाचेची मागणी मध्ये परिपुर्ण रक्कमेचा आकडा न आल्याने व लोकसेवक हे त्यांचे भायखळा ऑफीसचे सेवानिवृत्त कार्यक्रमाकरीता जाणार असल्याने पो.नि दाभाडे यांनी पुन्हा पडताळणी करीता १५.४८ वाजता पाठविले असता लोकसेवक सुर्यकांत जाधव हे कार्यालयात परत आले नव्हते. त्याबाबत मी त्यांच्या कार्यालयात रोहन नावाच्या व्यक्तीला विचारणा केली असता साहेब येतील असे त्याने सांगितले. त्यामुळे मी परत पोलीस वाहनाजवळ आलो.त्यावेळी पोनि दाभाडे यांनी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर बंद केला.

त्यानंतर पोनि दाभाडे यांनी पुन्हा सायंकाळी १६.४५ वाजता डिजीटल व्हाईस रेकॉर्डर चालू करून मोबाईल फोन क्र. ८६५५४६८७६५ चा स्पिकर ऑन करून मला दिलेल्या सुचनेप्रमाणे लोकसेवक यांचे ९०८२७९९४६६ वर संपर्क केला असता लोकसेवक व माझेमध्ये कामाविषयी व पैशाबाबत चर्चा झाली व तडजोडीअंती पहिला हप्ता लाचेची रक्कम रू. १५,०००/— दि. ०१/०६/२०१६ रोजी सुर्यकांत जाधव यांनी स्विकारण्याचे मान्य केले. सदरचे संभाषण व्हाईस रेकॉर्डवर ध्वनीमुद्रीत करण्यात आले. लोकसेवक सुर्यकांत जाधव यांची पडताळणी दरम्यान लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाल्याने व लोकसेवक यांना लाच रक्कम उदया दि. ०१/०६/२०१९ रोजी दयावयाची असल्याने पोनि दाभाडे यांनी पुढील कारवाई तात्पुरती स्थगित केल्याचे सांगितले. त्यानंतर पोनि दाभाडे यांनी मला घरी जाण्यास सांगून दिनांक ०१/०६/२०१९ रोजी सकाळी १०.०० वा. ला.प्र.वि कार्यालय, मुंबई येथे येण्यास सांगितले.

पोनि दाभाडे यांनी सांगितल्याप्रमाणे मी दिनांक ०१/०६/२०१९ रोजी ला.प्र.वि कार्यालयात सकाळी १०.०० वाजता हजर झालो. त्यावेळी पोनि दाभाडे यांनी मला लोकसेवक यांनी लाचेच्या रकमेची मागणी केली असुन आज रोजी सापळा कारवाई करावयाची आहे असे सांगितले. त्याप्रमाणे मला सापळा कारवाईच्यावेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत सुचना दिल्या. त्यानंतर मला ब्युरो कार्यालयाचे गोपनिय कक्षात नेवून माझे कडुन लाचेकरीता वापरण्यात येणारी रक्कम रू. १५,०००/— (रू. ५००/— दराच्या ३० भारतीय चलनी नोटा)

स्वतःचे ताब्यात घेतली. त्यानंतर सदरच्या नोटांना अ‍ॅथ्रासीन पावडर लावण्यात येणार असल्याचे सांगुन त्यांचे गुणधर्म व प्रात्यक्षिक करून दाखविले. तसेच पोनि दाभाडे यांनी लोकसेवक यांनी लाचेची रक्कम स्विकारल्यानंतर मला डावा हात डोक्यावरून फिरवून पुर्वनियोजीत इशारा करावा असे सांगितले. त्यावेळी पोलीस पथक हे कोणास संशय येणार नाही असे थांबून पुर्वनियोजीत इशारा मिळताच लोकसेवक यांस रंगेहात पकडतील असे सांगितले.

त्यानंतर ब्युरो कार्यालयाचे गोपनिय कक्षात पंचासमक्ष लाचेच्या रकमेस अ‍ॅथ्रासीन पावडर लावली व पोलीस पथक व पंचांसह सापळा कारवाईकरीता ब्युरो कार्यालयातून निघुन लोकसेवक यांचे घनकचरा व्यवस्थापक, एफ साऊथ वॉर्ड, परेल, मुंबई येथे आलो. त्यावेळी माझे शर्टाचे आतील बनियनला डिजीटल व्हाईस रेकॉर्डर चालू करून पंच श्री. वटांबे यांचेसह पाठविले व माझे पाठोपाठ पोलीस पथक काही अंतर ठेवून होते. मी लोकसेवकास भेटण्यास त्यांच्या कार्यालयात पंचासह गेलो असता लोकसेवक हे कार्यालयात उपस्थित होते. त्यावेळी मी लोकसेवक सुर्यकांत जाधव हे बसलेल्या टेबल जवळ जाऊन माझे फाईल संदर्भात चर्चा केली व यापुर्वी ठरलेली मी माझे कडील अ‍ॅथ्रासीन पावडर लावलेली लाचेची रक्कम रू. १५०००/– (रू. ५०० दराच्या ३० भारतीय चलनी नोटा) लोकसेवक यांच्याकडे दिली असता त्यांनी त्यांच्या टेबलावर असलेल्या पुस्तकामध्ये ठेवले. त्यानंतर मी त्यांचे कार्यालयातून बाहेर येवुन पोलीस पथकास लागलीच पुर्वनियोजीत डोक्यावर डावा हात फिरवुन पोलीसांना इशारा केला त्यावेळी लागलीच पोलीसांनी लोकसेवक सुर्यकांत जाधव यांस रू.१५,०००/– लाचेच्या रकमेसह रंगेहात पकडले.

तरी लोकसेवक सुर्यकांत आनंदराव जाधव, लिपिक, घनकचरा व्यवस्थापक, एफ साऊथ वॉर्ड, परेल, मुंबई यांनी माझे वडील कै. अशोक भाऊ शिंदे हे सेवानिवृतत झाल्यानंतर बृहन्मुंबई महानगर पालिकेचे नियमानुसार अनुकंपा तत्वावर वारस नोकरी (पी.टी. केस) करीता माझेकडे ४०,०००/– रूपयांची मागणी करून व फाईल हेडऑफीसला पाठविण्यासाठी तडजोडीअंती पहिला हप्ता रू. १५,०००/– लाचेची मागणी करून लाच रक्कम स्विकारली म्हणुन माझी त्याचेविरूध्द कायदेशिर तक्रार आहे. माझे सुर्यकांत जाधव यांचेशी कोणतेही पुर्ववैमनस्य अथवा आर्थीक देवाणघेवाणीचे व्यवहार नाहीत.

माझी वरील फिर्याद मराठीत टंकलिखीत केली असून ती मला मराठीत समजावुन सांगितली ती माझे सांगण्याप्रमाणे बरोबर व खरी आहे.

समक्ष,

Nitesh.Shinde

(अभय दाभाडे),
पोलीस निरीक्षक,
ला.प्र.वि., मुंबई